# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि/महाडीबीटी पोर्टल/२०१७/ 4173 दिनांक :- 27 SEP 2017

प्रति,

प्राचार्य/संचालक,

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सव तंत्रशिक्षण संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलचे लॉगिन आयडी व पासवर्ड पुरविणे बाबत...

संदर्भ :- १) संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक १८/तशिसं/महाडीबीटी पोर्टल/ २०१७/१५७ दिनांक २१/०९/२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मा.संचालक (आयटी) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई द्वारे नव्याने सुरु करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल/Maha DBT Portal द्वारे तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे मार्फत खालील शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २. डॉ.पजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना ३. उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती योजना (शासन निर्णय भाग-१) (वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)

उपरोक्त तिन्ही शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थ्यांकडुन ऑनलाईन अर्ज महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.mahadbt.gov.in द्वारे भरुन घेण्याकरिता तरतूद महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे.

सदर अर्जाची ऑनलाईन छाननी करण्यासाठी या विभागाअंतर्गत येणा-या सर्व तंत्रशिक्षण संस्थाना संस्थांचे लिपीक व प्राचार्य यांचेसाठीचे लॉगिन आयडी व पासवर्ड (म्हणजे एका संस्थेसाठी महाडीबीटी पोर्टलचे दोन लॉगिन आयडी) या कार्यालयामार्फत संस्थेचे प्राचार्य यांच्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या मोबाईलवर एसएमएस द्वारे पाठविण्यात आलेले आहे. संस्थेने लॉगिन आयडी व पासवर्डच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती काळजी घ्यावी, तसेच संबधित संस्थेला दिलेला पासवर्ड संस्थेने ताबडतोब बदलण्यात यावा. पासवर्डच्या गोपनीयतेची व योग्य वापराची संपुर्ण जबाबदारी संस्थाप्रमुख/प्राचार्याची राहील याची नोंद घ्यावी.

या कार्यालयाने सर्व संस्थांच्या प्रतिनिधींना दिनांक २९/०८/२०१७ रोजी महाडीबीटी पोर्टलचे प्रशिक्षण दिले आहे. सदर प्रशिक्षणामध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे विद्यार्थ्यानी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची उपरोक्तप्रमाणे पुरविण्यात आलेले लॉगिन आयडी व पासवर्ड वापरुन विहित मुदतीमध्ये छाननी करण्यात यावी व कोणताही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. ज्या संस्थाना मोबाईलवर एसएमएस द्वारे लॉगिन आयडी व पासवर्ड प्राप्त झालेला नाही अशा संस्थानी या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांचेशी तातडीने संपर्क साधून लॉगिन आयडी व पासवर्ड प्राप्त करुन घ्यावे.

विद्यार्थ्याना ऑनलाईन अर्ज भरताना येणा-या तांत्रिक अडचणी पत्राद्वारे desk18@dtemaharashtra.gov.in या मेलवर कळविण्यात याव्यात व त्याची एक प्रत या कार्यालयाच्या ईमेल आयडी वर पाठविण्यात यावी. तसेच सदर अडचणीचे निराकरण करण्यासाठी या कार्यालयाकडे पाठपुरावा करावा. कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांना / पालकांना या कार्यालयात पाठवु नये.

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे